सत्यमेव जयते
महाराष्ट्र वनविभाग

# संचालक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र,चिचपल्ली यांचे कार्यालय

(स्थित-चंद्रपूर) आकाशवाणी जवळ, बंगला नं. 28, चंद्रपूर-442401 ( महाराष्ट्र )
दूरध्वनी क्र.- 07172 272999 E-mail :- directorbrtc@mahaforest.gov.in

जावक क्र.कक्ष-5/प्रशिक्षण/2024-25/58 दिनांक :- 29/04/2024

## जाहिरात

बांबू क्षेत्राच्या सर्वंकष विकासासाठी संशोधन व प्रशिक्षण या हेतूने "बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र", चिचपल्ली, स्थित चंद्रपूर याची स्थापना झाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये पुरेशा प्रमाणात बांबूची उपलब्धता आहे. चंद्रपूर जिल्ह्यात बांबू हस्तकला, बांबू फर्निचर व कुटिरोद्योग यामध्ये पारंपारिक कारागीर असून नवकारागीर सुद्धा ह्या क्षेत्रात काम करण्यास उत्सुक आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात बांबू हस्तकला, फर्निचर व कुटीरउद्योगाची सद्यस्थिती जाणून घेणे, नमुना गावातील कारागिरांची आर्थिक क्षमता, संघटन, पारंपारिक वापरली जाणारी हत्यारे व साहित्य, त्यांचे सद्यस्थितीतील कौशल्य, कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंचा दर्जा व वस्तूंचे विपणन या सर्व बाबींचे नमुना सर्वेक्षण करून माहिती संकलित करणे, कारागिरांना कच्च्या मालाची उपलब्धता व दर्जा ह्याचे मूल्यांकन करणे, बांबू उद्योगाशी संबंधित विविध भागधारकां सोबत संवाद साधणे, ह्या कुटीर उद्योगाच्या सर्वंकष विकासासाठी विविध उपाययोजना सुचविणे आणि जिल्ह्यात बांबू कारागिरांची सक्षम क्षमता बांधणी करणे, कौशल्य आधारित प्रशिक्षण देणे व विपणनाचे जाळे विकसित करणे यासाठी एक सर्वंकष संरचना करण्याचे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली, स्थित चंद्रपूर यांचे नियोजन आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या सामूहिक सुविधा केंद्र (बांबू) यांची कार्यपद्धती, राबवत असलेल्या उपक्रमांचे प्रभाव व त्यांच्यासोबत जोडलेले कारागीर यांचे उत्पादन व विपणन ह्याचे मूल्यांकन करणे, यासाठी खालील प्रयोजनार्थ इच्छुक व मार्केट रीसर्च, कन्सल्टन्सी या क्षेत्रातील अनुभवी संस्थांकडून/ व्यावसायिक सल्लागारांकडून सर्वेक्षणासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यात एकूण पंधरा तालुके असून ह्यापैकी 5 तालुक्यात 6 सामूहिक सुविधा केंद्र (बांबू) अस्तित्वात आहेत (चंद्रपूर, चिचपल्ली, मूल, चिमूर, सिंदेवाही, पोंभुर्णा). उर्वरित प्रत्येक तालुक्यात सामूहिक सुविधा केंद्र (बांबू) उभारून पारंपारिक व नवकारागिरांच्या क्षमता बांधणी करण्यास खूप वाव आहे. त्याकरिता प्रत्येक तालुक्यातील नमुना गावांचे बांबू कुटिरोद्योग अनुषंगाने सविस्तर सर्वेक्षण खालील मुद्दे विचारात घेऊन करावयाचे आहे.

| अ.क्र. | तालुका | कामाचे स्वरूप / प्रकल्प व्याप्ती |
|---|---|---|
| 1. | | 1. कारागिरांचे क्षेत्र सर्वेक्षण – तालुक्यातील ५ नमुना गावातील कारागिरांची आर्थिक क्षमता, संघटन, पारंपारिक वापरली जाणारी हत्यारे व साहित्य, त्यांचे सद्यस्थितीतील कौशल्य, कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंचा दर्जा व वस्तूंचे विपणन या सर्व बाबींचे नमुना सर्वेक्षण करून माहिती संकलित करणे<br><br>2. नवकारागिरांशी संवाद साधून बांबू हस्तकलेबाबत त्यांचा कल जाणून घेणे<br><br>3.विविध भागधारकांशी संवाद - ग्रामीण आणि शहरी, पारंपारिक व अपारंपारिक कारागीर, सामूहिक सुविधा केंद्र (बांबू), बांबू कुटिरोद्योग, वितरक व विक्रेते, खरेदीदार, विविध सरकारी विभाग, वित्तीय संस्था, राष्ट्रीय सेवा योजना, बांबू क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, बचत गट संयुक्त व्यवस्थापन समित्या आणि जैवविविधता समित्या |

| | | |
|---|---|---|
| | | 4. कौशल्य, तंत्रज्ञान, उत्पादन डिझाइन आणि गुणवत्ता, पॅकेजिंग आणि सादरीकरण, कच्च्या मालाची गुणवत्ता आणि उपलब्धता, बाजारपेठेतील पोहोच आणि प्रतिसाद आणि नफा या संदर्भात विद्यमान सामूहिक सुविधा केंद्र (बांबू) आणि संबंधित कारागिरांची सद्यस्थिती ह्याचा सर्वंकष अभ्यास करणे, कमतरता शोधून काढणे व व प्रभावी उपाययोजना सुचविणे<br>5. विद्यमान बांबू सामूहिक सुविधा केंद्र (बांबू) यांचे प्रभाव मूल्यांकन व SWOT Analysis<br>5. बांबू कुटीरउद्योगाची बाजार रचना (मार्केट मॉडेल), ग्राहक मानसशास्त्र ह्याचा अभ्यास करणे व त्यानुसार बदल आणि उपाययोजना सुचविणे<br>6. कारागिरांचा व्यवसाय किंवा उद्योग म्हणून बांबू हस्तकलेचा अवलंब करण्याचा दाराच्या अभ्यास करणे<br>7. मार्केट डायनॅमिक्स - सामूहिक सुविधा केंद्र (बांबू) केंद्रित तालुक्यातील बांबू उत्पादित बांबू वस्तू उद्योगासाठी संभावना, चालना देणारे घटक, अवरोध, कल आणि संधी यांचा अभ्यास करणे<br>8. बांबू हस्तकला कला वस्तू फर्निचर व कुटीर उद्योग यांचा सर्वंकष विकास करण्यासाठी जागरूकता निर्माण करण्यासाठी उपाय योजना सुचविणे<br>9. कारागिरांच्या सक्षमीकरणासाठी आणि उपजीविकेसाठी इतर सरकारी विभाग व वित्तीय संस्थांद्वारे सध्या राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य सरकाराच्या योजनांचा अभ्यास करून बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राची त्यातील भूमिका व सहभाग काय असावा हे सुचविणे<br>10. बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे बांबू हस्तकला, बांबू फर्निचर व कुटिरोद्योग याविषययीचे धोरण काय असावे आणि त्यासाठीची सर्वसमावेशक आणि सर्वंकष संरचना कशी असावी याची शिफारस करणे<br>11. बांबू उद्योगाचे चित्र बदलण्यासाठी बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राने केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करावा अशा धोरणातील बदलांची यादी सुचविणे |

परिपूर्ण भरलेल्या निविदा प्रत्येक तालुक्यासाठी स्वतंत्र बंद लिफाफ्यात बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयात दिनांक 06-05-2024 सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्रत्यक्ष अथवा डाक पोस्टने पाठवाव्यात. लिफाफ्यावर स्पष्ट अक्षरात " बांबू हस्तकला, कला वस्तू, बांबू फर्निचर व कुटिरोद्योग याचे सर्वेक्षण - (तालुक्याचे नाव)" असे लिहिलेले असावे. निविदा दिनांक 07-05-2024 ला दुपारी बारा वाजता उघडण्यात येतील. बांबू क्षेत्रातील डिझाईन, तंत्रज्ञान, मार्केट ह्याचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या संस्थांना गुणवत्तेनुसार प्राधान्य दिल्या जाईल. तालुक्यातील ५ नमुना गावांची यादी आणि निकष हे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांच्याकडून निवड झालेल्या संस्थेस उपलब्ध करून देण्यात येतील.

अटी व शर्थी ह्या बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली येथे उपलब्ध आहेत.

## अटी व शर्थी

1. शासन नोंदणी प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे संस्थेस पुरविणे बंधनकारक आहे.
2. कामाचा अनुभव दाखवणारे Presentation संस्थेने मुद्रित अथवा डिजिटल माध्यमात उपलब्ध करून द्यावे.
3. नमुना सर्वेक्षण, प्रभाव मूल्यांकन, विश्लेषण व शिफारसी यांचा अहवाल हा मुद्रित स्वरूपात संस्थेने सादर करावा. उत्तम दर्जाच्या मुद्रण व बाइंडिंग करिता लागणारा खर्च बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र करेल.
4. ह्या कामासाठीचा अवधी हा ४५ ते ६० दिवस इतका ठरविण्यात आला आहे.

5. तालुक्यातील व जिल्ह्यातील प्रवासखर्च व जेवण खर्च हा नमुना सर्वेक्षण करणाऱ्या सल्लागार संस्थेकडे राहील. ह्या कामाकरिता जिल्ह्याबाहेर कुठे भेटी द्याव्या लागल्यास त्याचा अतिरिक्त खर्च दिल्या जाईल. सर्वेक्षण चमू च्या प्रत्येक गाडीबरोबर स्थानिक मार्गदर्शक म्हणून बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांचा एक प्रतिनिधी दिल्या जाईल.

6. सर्वेक्षण चमूच्या निवास व्यवस्था क्षेत्र सर्वेक्षणाच्या प्रवास योजनेनुसार अतिथीगृहांमध्ये बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांचेद्वारे केल्या जाईल.

7. चंद्रपूर जिह्ल्यातील प्रत्येक तालुक्यातील ५ गावांची निवड बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली ह्यांच्याद्वारे केल्या जाईल व तसे संस्थेस कळविण्यात येईल. ५ पेक्षा अधिक गावांचे नमुना सर्वेक्षण करावयाचे ठरल्यास त्यानुसार प्रति गाव सर्वेक्षणासाठीचा वाढीव खर्च / किंमत ही बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली व निवड झालेली संस्था हे समन्वयाने ठरवतील.

8. हे सर्वेक्षण व विश्लेषण उच्च दर्जाचे व वास्तवदर्शी व्हावे यासाठी बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करून देईल तसेच विविध सरकारी विभागांशी समन्वय करण्यासाठी सहकार्य करेल..

9. चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास करण्याचा निर्णय घेण्यात आला असला तरी तालुक्यांचा प्राधान्यक्रम निश्चित करून उपलब्ध मनुष्यबळासह आदेश निर्गमित करण्याचे अंतिम अधिकार संचालक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र यांचा कडे राखीव करण्यात येत आहे.

10. मूल्य/ मानधन संवितरण अटी - निवड झालेल्या संस्थेस कामाच्या प्रगतीनुसार ४ टप्प्यात दिले जाईल.

**टप्पा** 1 - संस्थेची निवड झाल्यावर प्रवासखर्चासाठी प्रकल्पाच्या एकूण किमतीच्या 25% रक्कम दिल्या जाईल.

**टप्पा** 2 - नमुना सर्वेक्षणाची चमू पोहोचून सर्वेक्षण सुरु झाल्यानंतर 10 दिवसांनी 25% रक्कम दिल्या जाईल.

**टप्पा** 3 - नमुना सर्वेक्षण, विविध भागधारकांशी संवाद, सामूहिक सुविधा केंद्र (बांबू) यांचे सर्वेक्षण झाल्यानंतर माहिती विश्लेषणासाठी 25% रक्कम दिल्या जाईल.

**टप्पा** 4 - अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर उर्वरित 25% रक्कम दिल्या जाईल.

11. निविदा मंजूर / नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार हा संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली ह्यांचा राहील

**पत्ता :**

Bamboo Research & Training Centre
Building-28, Civil lines, Chandrapur,
Maharashtra. 442401, India

**(अशोक नि.खडसे)**
**संचालक,**
**बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली**
**(स्थित-चंद्रपूर)**